# डॅफोडिल.....



शाळेत असतांना निसर्ग कवी “ विल्यम वर्डस्वर्थ “ ह्यांची डॅफोडिल ही कविता बांईंनी खूप सुरेख शिकवली होती ! तेव्हापासून वाऱ्याबरोबर डोलणारी आणि नाचणारी सोनेरी डॅफोडिलची फुलं, मनात घर करून राहिली होती. नंतर वहीच्या पहिल्या किंवा शेवटच्या पानावर त्या फुलांचे चित्र दिसायचे. माझ्या आवडत्या विषयांसाठी मी ती फुले असलेली वही हमखास घ्यायची. कधीतरी छोट्या मुलांच्या पुस्तकात डॅफोडिल फुलाचे चित्र असायचे. तेव्हढीच माझी त्या फुलाची ओळख होती.

मोठेपणी “ डॅफोडिल प्रिन्सिपल” बद्दल कळले, त्याची गोष्ट कळली आणि डॅफोडिल ह्या फुलांबद्दलची माझी उत्सुकता शिगेला पोहोचली.
काय होती गोष्ट?...

थोडक्यात सांगायचे तर एक सामान्य बाई.... आपले दोन हात, दोन पाय आणि थोडी बुध्दी आणि प्रचंड इच्छाशक्ती वापरून दुनिया बदलते... एक असामान्य, अद्भुत, सुंदर जग भविष्यात निर्माण करते ....

काय केले तिने?.....

४० पेक्षा जास्त वर्षे तिने एकटीने ... रोज एक, ह्या प्रमाणे ५०,००० डॅफोडिलचे कंद लावले.. १९५८ पासून ती हे काम करत होती.. आणि त्याचे फळ म्हणजे डॅफोडिलची, मैलोन मैल पसरलेली सुंदर, सोनेरी दुनिया तिने जगाला दिली.

त्याबरोबरच एक शिकवणही दिली ......... “आपले ध्येय ठरवा, त्यासाठी रोज, प्रेमाने टाकलेल्या छोट्या पावलांनी, नेटाने सतत प्रयत्न केलेत, तर तुम्ही तुमचे ध्येय साध्य करून, तुमची दुनिया नक्कीच बदलू शकता“ .......



तेव्हापासून डॅफोडिल फुले पहायची इच्छा मनात निर्माण झाली आणि सियाटलला ती पूर्णही झाली.. तिथे ४५० एकर जागेत पसरलेला, डॅफोडिलचा सोनेरी गालिचा पाहून खूप आनंद झाला. इतके विलक्षण दृष्य मी आधी कधी पाहिले नव्हते.

युरोप, जर्मनी, स्पेन, इंग्लंड, पोर्तुगाल अशा ठिकाणी सापडणाऱ्या ह्या फुलांच्या ५० जाती आणि १३०० संकरीत जाती आहेत. ग्रेट ब्रिटनमधील वेल्स या विभागाचे डॅफोडिल हे राष्ट्रीय फूल आहे. जंगल, खडकाळ प्रदेश, गवताळ प्रदेश, बागा अशा अनेक ठिकाणी ही फुले, थंडी, वारा, पाऊस ह्याला न जुमानता, वर्षातून एकदा फुलतात. जमिनीतले कंद अनेक वर्षे टिकून, जगाला सौंदर्य दाखवायचे काम करतात. चांगले ऊन आणि निचरा होणारी जमीन असली की झाले! वसंत ऋतूची सूचना द्यायला ही फुले हजर! फेब्रुवारीच्या शेवटी, ते मे च्या सुरवातीपर्यंत ही फुले कुठे न कुठे तरी दिसतात.

बागेत लावायला ह्या फुलांना खूप मागणी असते. तशीच जास्त दिवस टिकतात म्हणून फ्लोरिस्ट ही पसंत करतात. ह्या फुलांच्या कंदांचे विभाजन करून, किंवा फुलांच्या मागील बीजांडात ज्या २०/२५ बिया येतात, त्या वापरून नविन झाडे लावता येतात. कंदामधून ५/६ पानांचा झुबका निघतो. ही पाने लांब, निमुळती, पातीसारखी असतात. त्यांमधून फुलाचा दांडा निघतो. ६ पाकळ्यांचे फूल असते. मध्ये रंगीत झुंबरासारखा भाग असतो. एका फांदीवर ५/६ फुले येऊ शकतात.

एव्हढी सुंदर, सोज्वळ फुले विषारी कशी ? हे एक आश्चर्यच वाटते. ह्याचे कंद, पानं, फुलांच्या देठातून आलेला रस विषारी आहे. त्यामुळे खारी, ससे, हरणे, पक्षी ह्या फुलांच्या वाटेला जात नाहीत. पूर्वी भाजल्यावर, जखमेवर, सांध्याच्या वेदनेवर ह्या फुलांचा औषध म्हणून वापर होत असे. आता मेंदूतील कर्करोगाची वाढ रोखण्यासाठी या वनस्पतींचा वापर होतो.

या झाडापासून उग्र, व सुगंधी तेल आणि उच्च प्रतीचे फ्रेंच अत्तर बनवतात. फुले सुकल्यावर खूप दिवस झाड तसेच ठेवतात. त्यामुळे पुढच्या वर्षीसाठी कंद शक्ती जमा करतात.

डॅफोडिल हे फूल आनंद, वसंत ऋतु, पुनर्जन्म आशा, नूतनीकरण ह्याचे प्रतिक आहे. अमेरिकेत काही कॅन्सर सोसायटीचेही डॅफोडिल फूल, चिन्ह म्हणून वापरतात.

चांगल्या भविष्यासाठी या फुलांचा गुच्छ भेट देणे हे शुभ मानतात. आपण जसा एक गुलाब शुभेच्छांसाठी देतो, तसे एक डॅफोडिलचे फूल देत नाहीत, ते अशुभ मानतात. डॅफोडिल फुलांचे वसंत ऋतु सुरू व्हायच्या आधी, ज्याला प्रथम दर्शन होते त्याची भरभराट होते असा समज आहे.

आपल्या इथे या फुलांना नर्गिस म्हणतात.

**........ चित्रा मेहेंदळे**

#वनस्पती,#डॅफोडिल,#सौंदर्य,#पर्यावरण,#सुंदरफुलं